PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Bharat ala parat
Year: 2007

Song: Nirashes tya dur saaruni
Lyricist: Vijay Gokhale

निराशेस त्या दूर सारूनी
मनास जागे पुन्हा करूनी
निराशेस त्या दूर सारूनी
मनास जागे पुन्हा करूनी
स्वप्न स्वतःचे सार्थ कराया
घेऊनिया शपथ
भरत आला परत
परत आला भरत
भरत आला परत
परत आला भरत

जरी गरीबीत वाढला
संस्कार असा लाभला
माय ममतेने जो भरला
प्रेमाने सुंदर घडला
होत्या समोर नव्या दिशा
पत्करला डॉक्टर पेशा
आणि भिनली अंगी ज्याच्या
लोकसेवेची नवी नशा
मग पाहिली त्याने दुनिया
आ आ आ...
मग पाहिली त्याने दुनिया
दिसली काळोखाची छाया
नको काही विचार कराया
फक्त माया आणि माया
फक्त माया आणि माया
आदर्श ज्यास मानावे
त्याने असे कसे असावे
कोणी कुणा फसवावे
चोराने साव ठरावे
हे सारे समजून मनास उमजून
मरगळ झटकून यावर काही
उपाय करण्या घेऊनिया शपथ
भरत आला परत
परत आला भरत

जुळले होते धागे असे
आता ते विसरावे कसे
नकळत सारे घडले आता
हाती कुणाच्या काही नसे
आता घडावी हातून सेवा
आता घडावी हातून सेवा
प्रेम दीप नशीबी यावा
अंधारातून मार्ग दिसावा
तुझ्या कृपेने देवा रे देवा
देवा रे देवा
हीच भावना अंतरी ठेऊन
मनी साठवून उरी दाटवून
स्वप्न स्वतःचे सार्थ कराया
घेऊनिया शपथ
भरत आला परत
परत आला भरत
भरत आला परत
परत आला भरत
भरत आला परत
परत आला भरत
भरत आला परत
परत आला भरत

Literacy for a Billion

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*